# महाविद्यालयाचे नियम व अटी

१. महाविद्यालयीन विद्यार्थ्यास गणवेश अनिवार्य राहील.

२. शासकीय नियमानुसार महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास बंदी आहे.

३. महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे.

४. प्राध्यापकांचा आज्ञाभंग करणे आणि प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे या कृत्याचा शिस्तभंगात समावेश होतो.

५. आपली वाहने वाहनतळावर लावावीत.

६. विद्यार्थ्यांने तासिकेस व प्रात्यक्षिकास उपस्थित राहाणे अनिवार्य आहे व बायोमेट्री करणे आवश्यक आहे.

७. महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखु, पान खाण्यास, बिडी, सिगारेट ओढण्यास सक्त बंदी आहे.

८. वर्गामध्ये तसेच महाविद्यालयीन परिसरात कोणत्याही प्रकारचे छाया-चित्रण, चलचित्री करण (फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करण्यास मनाई आहे. )

९. कोणत्याही प्रकारचे शस्त्र, ज्या द्वारा शारिरीक इजा पोहचवता येईल असे महाविद्यालयीन परिसरात बाळगण्यास बंदी आहे.

१०. महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे यास मनाई आहे.

११. वर्गामधील पंखे, बेंच, फर्निचर, दिवे यासारख्या वस्तु काळजीपूर्वक वापराव्यात. महाविद्यालयीन सामुग्रीला कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचणार नाही याची काळजी घ्यावी.

१२. ओरडणे, गोंधळ, गोंगाट करणे, ग्रंथालय वाचन कक्षात मोठयाने बोलणे तसेच पोर्च, पॅसेज मध्ये विनाकारण फिरणे, थांबणे यास मनाई आहे.

१३. महाविद्यालयाशी संबंधित नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस विनापरवानगी प्रवेश करता येणार नाही.

१४. प्रयोगशाळा, ग्रंथालय, बोटक्लब इ. साठी त्या व्यवस्थापनाने बनवलेल्या नियमांचे पालन करणे.

१५. वर्गामध्ये विनापरवानगी प्रवेशास बंदी आहे.

१६. शैक्षणिक सहलीचे आयोजन प्राचार्यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. अशा विनापरवानगी आयोजित कोणत्याही सहलीची जबाबदारी महाविद्यालयीन व्यवस्थापनावर राहणार नाही.

१७. कोणत्याही तक्रारी संबंधी प्राचार्यांशीच बोलणी करावी. परस्पर प्रसारमाध्यमे व वृत्तपत्रांशी बोलणी करू नये. संपर्क साधु नये.

१८. कोणत्याही धार्मीक, समाजविरोधी, महाविद्यालय विरोधी चळवळीत, माहिमेत विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही. १९. महाविद्यालयाद्वारा आयोजित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अभ्यासक्रमांना पुरक, सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे.

२०. कॉपी किंवा त्यासारखे वर्तन परिक्षेच्या कक्षात केल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

२१. एकदा जमा केलेली मुळ कागदपत्रे परत मिळणार नाही.

२२. मुळ कागदपत्रांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचा प्रयत्न केल्यास सक्त कारवाई करण्यात येईल.

२३. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त कोणत्याही उपक्रमाचे पत्रके व संघटन महाविद्यालयीन परिसरात तयार करणे, वाटण्याची परवानगी नाही.

२४. ७५ टक्के पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांचा परीक्षेचा अर्ज महाविद्यालयाचे व्यवस्थापन नाकारेल.

२५. महाविद्यालयीन व्यवस्थापनाने वेळोवेळी बनवलेले सर्व नियम पाळणे बंधनकारक आहे.

२६. दुय्यम ओळखपत्रासाठी रू. १००/- आकारण्यात येतील. वरील नियमांचे पालन न केल्यास खालील प्रकारच्या कारवाईस विद्यार्थी पात्र राहतील.● १. प्रवेश रद्द करणे. २. सत्र रद्द करणे. ३. परीक्षेचा फॉर्म नाकारणे. ४. परीक्षा दालनातून निलंबन ५. परीक्षेचा निकाल राखून ठेवणे. ६. महाविद्यालयातून निलंबन ७. दंड ८. अनामत रक्कम जप्त करणे.